क्रमांक:एमआयएस-०६१७/सीआर-५०/२०१७/तीन दिनांक :- ८ ऑगस्ट, २०१८

# घोषणा

**विषय**:- परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी सादर करावयाच्या ओळखीच्या पुराव्याबाबत.

आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षांकरीता परीक्षेस येताना ओळखीच्या पुराव्यासाठी उमेदवाराने स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड व स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतीही दोन मूळ ओळखपत्रे तसेच त्यांच्या छायांकित प्रती (दोन वेगवेगळ्या ओळखपत्रांच्या) सोबत आणणे अनिवार्य असल्याबाबत आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक १२ एप्रिल, २०१८, ७ जून, २०१८ व १२ जून, २०१८ रोजीच्या घोषणेद्वारे सूचना देण्यात आली होती.

**२.** आयोगामार्फत आयोजित परीक्षांमध्ये उमेदवारांकडून करण्यात येणा-या गैरप्रकाराच्या प्रयत्नांच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनेचा भाग म्हणून परीक्षेच्या वेळी उमेदवारांची बायोमॅट्रिक पध्दतीने ओळख पडताळणी करण्याची नवीन कार्यपध्दत सुरु करण्यात आली आहे. सदर कार्यपध्दतीच्या अनुषंगाने ज्या परीक्षांकरीता उमेदवारांची बायोमॅट्रिक पध्दतीने ओळख पडताळणी करण्यात येणार आहे; अशा परीक्षांकरीता वर नमूद पाच वैध ओळखपत्रांपैकी दोन मूळ ओळखपत्रांऐवजी एका मूळ ओळखपत्राच्या आधारे उमेदवारांना परीक्षेस प्रवेश देण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

**३.** आयोगाच्या उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने ज्या परीक्षांकरीता उमेदवारांची बायोमॅट्रिक पध्दतीने ओळख पडताळणी करण्यात येणार आहे, अशा परीक्षेकरीता उमेदवारांनी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड व स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सादर करणे अनिवार्य राहील.

**४.** वर नमूद पाच वैध मूळ ओळखपत्रांच्या पुराव्याऐवजी त्यांच्या छायांकित प्रती अथवा कलर झेरॉक्स अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा ओळखीचा पुरावा सादर केल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही व संबंधित उमेदवाराला परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल.

**५.** ओळखीच्या पुराव्यासाठी परीक्षेच्या वेळी सादर करावयाच्या ओळखपत्रांसंदर्भात संबंधित परीक्षेच्या प्रवेश प्रमाणपत्रावर दिलेल्या सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करणे, उमेदवारांच्या हिताचे राहील.

**६.** सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक ६ ऑगस्ट, २०१८ नंतर आयोजित परीक्षांकरीता करण्यात येईल.

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण:- मुंबई

TRIAL MODE - a valid license will remove this message. See the keywords property of this PDF for more information.